


दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com RNI NO-MAHMAR/2022/90217

वर्ष ३ रे अंक : ४०६ शुक्रवार दि 03 जुलै २०२६ पृष्ठ ८ किमंत ३ रुपये

# ४० वर्षांनी बाळासाहेब ठाकरेंच्या त्या मागणीला यश; केंद्र सरकारने दिली मंजूरी, महाराष्ट्रातल्या....

**वृत्तसंस्था-मुंबई**

सांगलीमधील इस्लामपूर शहराचं नामांतर सध्या चर्चेत आलं आहे. या शहराच्या नामांतराला आता केंद्र सरकारनेही हिरवा झेंडा दाखवला आहे. केंद्र सरकारच्या भारतीय सर्वेक्षण विभागाकने राज्य सरकारला यासंबधीतचे अधिकृत मान्यतेचे प्रमाणपत्र दिले आहे. त्यामुळे आता या शहराचे नाव अधिकृतपणे ईश्वरपूर असणार आहे. काही दिवसांआधी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही या निर्णयाबद्दल विधानसभेमध्ये माहिती दिली होती. विधीमंडळाच्या पावसाळी अधिवेशनामध्ये इस्लामपूरचे नाव ईश्वरपूर करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठवला असल्याचे मंत्री छगन भुजबळ म्हणाले होते. त्यानंतर आता राज्य सरकारच्या प्रस्तावाला केंद्र सरकारने मान्यता दिली आहे. सगळीकडे कागदोपत्री व्यवहारांमध्येही आता इस्लामपूरचं नाव बदलून ईश्वरपूर केलं जाणार आहे. राज्य शासनाच्या गृहमंत्रालयाने आवश्यक कागदपत्रे, प्रस्ताव आणि स्थानिक शिफारशीसह नामांतराचा हा अहवाल तयार करून पाठविला होता. दरम्यान, मान्यता मिळाल्यामुळे आता महाराष्ट्र सरकार पुढील प्रशासकीय कारवाई तथा अंमलबजावणी करण्यास सुरुवात करणार आहे. महायुती सरकारने याआधीही राज्यातील अनेक शहरांची नावे बदलली आहेत. राज्यात उस्मानाबाद, अहमदनगर आणि औरंगाबाद या तीन शहरांची नावं बदलल्यानंतर आता इस्लामपूरचेही नाव बदलले जाणार आहे. त्यामुळे या यादीत एका नावाची भर पडली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून इस्लामपूरचे नाव बदलावे अशी मागणी स्थानिक करत होते. सर्वप्रथम या नामांतराची ही मागणी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख पंत सबनीस यांनी १९७० मध्ये केली होती. त्यांच्या मते शहराचे नाव भारतीय संस्कृती आणि धार्मिक वारशाबरोबर सुसंगत असले पाहिजे असे होते. त्यानंतर पुढे शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी या शहराच्या नामांतराची मागणी जाहीर सभेतून केली होती. १९८६ मध्ये त्यांची शहराच्या यलाम्मा चौकात सभा झाली होती. तिथे भाषणात हे इस्लामपूर



नव्हे तर ईश्वरपूर आहे, असा उच्चार त्यांनी केला होता. त्यानंतर या विषयाला पुढे अनेक वर्ष स्थानिक नागरिक, संस्था, आणि राजकीय नेत्यांनी पाठिंबा दर्शविला. अखेर आज शहराच्या नामांतरचा मार्ग मोकळा झाला आहे. हे नामांतर होत असल्याने ज्यांची नामांतराची मागणी होती त्या सर्वांनी आनंद व्यक्त केला आहे, काही ठिकाणी लोकांनी फटाकेही फोडले आहेत.

# भाजप विरोधकांच्या बाथरुममध्येही कॅमेरे लावेल...; फोन टॅपिंगवरुन काँग्रेसच्या बड्या नेत्याचा हल्लाबोल, रश्मी शुक्लांचं नाव घेत फडणवीसांना केलं लक्ष्य!



**वृत्तसंस्था मुंबई**

सध्या राज्यात महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलेलं वक्तव्य राजकीय वर्तुळात चर्चेत आहे. बावनकुळेंनी त्यांच्या स्वतःच्या पक्षाच्या म्हणजेच भाजपच्या कार्यकर्त्यांना एक इशारा दिला आहे. तो म्हणजे सर्वांचे फोन टॅप करत असल्याचा. आगामी निवडणुका लक्षात घेत पक्षातल्या नेत्यांनी कार्यकर्त्यांनी बेईमानी केली तर याद राखा, सर्वांचे फोन सर्विलन्सवर टाकलेले आहेत, असे ते म्हणाले आहेत. तुम्ही कोणाशी काय बोलता, कोणाशी काय संवाद साधता हे सर्व आम्हाला समजते, असं बावनकुळे म्हणाले होते. त्यांच्या या वक्तव्यावरुन आता विरोधकांनी बावनकुळे आणि भाजपला टार्गेट केलं आहे. हा विषय फक्त भाजप कार्यकर्त्यापूरता नसून विरोधकांचेही फोन टॅप केले जात आहेत, असा आरोप ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांनी केला आहे. याशिवाय आता काँग्रसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही भाजपला धारेधवर धरले आहे. फोन टॅप करण्याच्या प्रकरणावर बोलताना हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, सत्तेमधील त्यांच्याच मित्रपक्षांवर भाजप पाळत ठेवत आहे. माबाईल सर्विलन्सवर टाकणे हे भाजपसाठी नवीन नाही. भाजपने यापूर्वीही पेगॅसेससारखे प्रकार केले आहेत. राज्यात रश्मी शुक्ला या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याने देवेंद्र फडणवीस यांच्या सांगण्यावरुन जवळपास ५० नेत्यांचे फोन बेकायदेशिरपणे टॅप केले. त्यांच्यावर गुन्हे दाखल केले गेले पण, फडणवीस सत्तेत आले की पुन्हा शुक्लांना पोलीस प्रमुखपदी बढती मिळाली. फोन टॅपिंगवर पुढे बोलताना सपकाळ म्हणाले की, ङ्कङ्कभाजपवाले आते विरोधकांच्या बाथरुम, संडासमध्येही कॅमेरे लावायला मागेपुढे पाहणार नाही, कारण ते संस्कृती सभ्यतेच्या पुढे गेले आहेत. ही भाजपची मोडस ऑपरेंडी आहे. चंद्रशेखर बावनकुळे आता लवकरच त्यांच्या विधानावर घुमजावही करतील.ङ्कङ्क, असे म्हणत हर्षवर्धन सपकाळांनी भाजपवर जोरदार निशाणा साधला आहे. एका महिला डॉक्टरला पोलिसांच्या अनन्वीत छळाला कंटाळून आत्महत्या करावी लागली, ही घटना पोलिस विभागाला लाज आणणारी आहे, गृहविभागाची लक्तरे वेशीवर टांगणारी आहे. गृहमंत्री देवेंद्र फडणवीसांचे गृहविभागावर नियंत्रण नाही. याची लाज बाळगून त्यांनी गृहमंत्रीपदाचा राजीनामा दिला पाहीजे, राज्याला पूर्णवेळ गृहमंत्री द्या, अशी टीका हर्षवर्धन सपकाळांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांवर केली आहे.

# रक्ताचे दरोडेखोर



अवघ्या देशासाठी परमपवित्र असलेले सत्यवचनी प्रभू श्रीरामचंद्र यांच्या चरणी लक्षावधी भाविकांनी वाहिलेल्या पैशांचा, चीजवस्तूंचा अपहार करण्यासही अनेक हात धजावत असतील, तर मानवी रक्ताचा अपहार करताना कुणाचे हात थरथरतील, ही शक्यताच मोडीत निघते. मुंबईतील ङ्गसर जे. जे. महानगर रक्तपेढीफ्चे प्रकरण हे याचे ढळढळीत उदाहरण. ङ्गमहाराष्ट्र टाइम्सफ्ने गेल्या आठवड्यात या संदर्भातील अनेक बातम्यांद्वारे हे गैरप्रकार चव्हाट्यावर मांडले. हजारो रुग्णांसाठी आशेचा किरण असलेल्या जे. जे. रुग्णालयाच्या परिसरातील ङ्गसर जे.जे. महानगर रक्तपेढी मचे हे पापकृत्य. जे. जे. रुग्णालयाचा या पापकृत्यांशी काहीही संबंध नाही, हे येथे अधोरेखित करणे महत्त्वाचे. या रक्तपेढीने चिंचपोकळी भागातील एका मंडळाच्या मदतीने रक्तदान शिबिर आयोजित केले. त्यात संकलित झालेल्या ७७ रक्तपिशव्यांतील किमान ५५ रक्तपिशव्या बदलापूरच्या ङ्गमायाफ नामक खासगी रक्तपेढीला एक छदामही न आकारता दिल्या. सर जे. जे. महानगर रक्तपेढीफ्चे संचालक डॉ. हितेश पगारे व सामाजिक वैद्यकीय अधिकारी अजय भिसे यांचे ङ्गमायाफ रक्तपेढीतील व्यक्तींशी असलेले लागेबांधे हा यातील योगायोग नक्कीच नसणार. हे उघड झाल्यावर राज्य रक्त संक्रमण परिषदेने सर जे. जे. महानगर रक्तपेढीला दंड केला. त्यानंतर या रक्तपेढीचे, रक्तसंकलनातील त्रुटी, अनारोग्यकारक रक्ताचे वितरण असे डोळे विस्फारणारे प्रतापही समोर येत आहेत. याबाबत रोजच्या रोज हाती लागणारी माहिती पाहता यातून कितीजणांच्या तुंबड्या कोट्यवधी रुपयांनी भरल्या असतील याचा अदमास येतो. खरे तर, रक्तदान शिबिरे व त्यात संकलित केले जाणारे रक्त, रक्तपेढ्या हा अतिशय नाजूक व तितकाच महत्त्वाचा विषय. कारण तो थेटच रुग्णांच्या जगण्याशी संबंधित असा. ङ्गरक्तदान श्रेष्ठदानफ हे घोषवाक्य खरोखरच सार्थ असेच. त्यालाच जागून हजारो लोक शिबिरांमध्ये आत्यंतिक कृतज्ञतेने, उदात्त भावनेने रक्तदान करतात. रक्तदानानंतर मिळते एक कप कॉफी आणि चार बिस्किटे! इतक्याचीही अपेक्षा लोक रक्तदानावेळी ठेवत नाहीत. यास कारणीभूत असते ती त्यांच्या मनात समाजाविषयीची संवेदनशीलता. मात्र, या लाल रंगाच्या रुधिराचा काळाबाजार करून, त्यावर दरोडा टाकून, त्याचा गैरव्यवहार करून मिळणाऱ्या पैशांना चटावलेले लोक त्याबाबत असे संवेदनशील असणे दुरापास्तच. मग, रक्तदान शिबिरे आयोजित करण्याचे नियम, रक्तसंकलनाचे नियम, त्याच्या वितरणाचे नियम, रक्तपेढ्यांच्या मंजुरीचे निकष या सगळ्याच गोष्टी धाब्यावर बसवल्या जातात. रक्तदान शिबिरे, रक्तपेढ्या व त्यासंबंधित साऱ्या गोष्टींचे नियंत्रण करण्याची जबाबदारी रक्तसंक्रमण परिषदेची. या परिषदेवर नियंत्रण आरोग्य संचालनालयाचे आणि आरोग्य संचालनालय येते ते आरोग्यखात्याच्या अखत्यारीत. त्यामुळे सरतेशेवटी या सगळ्याची जबाबदारी येऊन पडते ती आरोग्य खात्यावर, म्हणजे या खात्याचे मंत्री प्रकाश आबिटकर यांच्यावर. महाराष्ट्राचे आरोग्य सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी पार पाडताना केवळ आरोग्ययोजना, उपक्रम एवढ्यापुरते मर्यादित राहून चालणार नाही; इतरही आनुषंगिक गोष्टींवर तितकेच लक्ष देणे गरजेचे आहे, हे या निमित्ताने आरोग्यमंत्र्यांनी लक्षात घ्यावे. रक्तपेढी म्हणजे जीवनदायीनी ही बहुसंख्यांची धारणा असली आणि ती खरीही असली तरी ङ्गजे. जे. महानगर रक्तपेढीफ्सारखे उदाहरण या धारणेचा वर्ख खरवडणारे ठरते. एकूणच रक्तपेढ्यांच्या मंजुरीचे व्यवहार अनेकदा चर्चेचे, वादाचे विषय ठरलेले आहेत. राजकीय नेते साखर कारखान्यांच्या मंजुरीसाठी जसे दबाव आणत असतात; तसेच ते रक्तपेढ्यांच्या मंजुरीसाठीही ङ्गवजनफ वापरत असतात, एवढे लक्षात घेतले तरी यात हाती लागणारी रोकडमाया (आणि ङ्गपुण्यफ्ही) किती असू शकते याचा अंदाज यावा! ङ्गजे. जे. महानगर रक्तपेढीफ हे एक उदाहरण. सरसकट सगळ्याच रक्तपेढ्यांना संशयाच्या पिंजऱ्यात उभे करणे अनुचित असले, तरी एकूण या क्षेत्राची झाडाझडती गरजेची ठरते. हितेश पगारे व अजय भिसे यांना सक्तीच्या रजेवर पाठवले गेले आहे. ङ्गजे. जे. महानगर रक्तपेढीफ तसेच ङ्गमाया रक्तपेढीफ्ही सील करण्यात आली आहे; पण हे पुरेसे नाही. असल्या हिणकस गैरव्यवहारांची व्याधी दूर करायची तर त्यासाठी फौजदारी कारवाईची शस्त्रक्रिया करायलाच हवी. रक्तावर दरोडा घालणाऱ्यांना जरब बसायलाच हवी.




*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

# ‘एसआयआर’वरून एकवटले विरोधक

## आप-द्रमुक देखील काँग्रेससोबत : 23 राजकीय पक्षांचे सरन्यायाधीशांना पत्र

■ नवी दिल्ली/वृत्तसंस्था

मतदार यादीच्या स्पेशल इंटेसिव्ह रिव्हिजनच्या (एसआयआर) मुद्द्यावरून विरोधी पक्षांची आघाडी ‘इंडी’ला पुन्हा एकजूट होण्याची संधी मिळाली आहे. एसआयआर प्रक्रियेवर विरोधी पक्षांनी स्वत:च्या चिंता मांडणारे पत्र सरन्यायाधीश सूर्यकांत यांना लिहिले आहे. या पत्रावर आम आदमी पक्ष आणि द्रमुकच्या नेत्यांनीही स्वाक्षरी केली आहे.

एसआयआर प्रक्रियेवर आतापर्यंत सर्वोच्च न्यायालयात विरोधी पक्ष खासकरून ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसला अनेकदा झटके बसले आहेत. परंतु याप्रकरणी सरन्यायाधीशांना पत्र लिहिण्याकरता विरोधी पक्ष पुन्हा एकत्र आले आहेत. इंडी आघाडीची पुढील बैठक आता ऑगस्ट महिन्यात हैदराबाद येथे पार पडणार आहे. 2024 च्या लोकसभा निवडणुकीनंतर आम आदमी पक्षाने काँग्रेसवर आरोप करत इंडी आघाडीतून काढता पाय घेतला होता.




तर अलिकडेच पार पडलेल्या तामिळनाडू विधानसभा निवडणुकीनंतर काँग्रेस पक्ष विजय यांच्या टीव्हीकेसोबत सरकारमध्ये सामील झाल्यावर द्रमुकने इंडी आघाडीपासून अंतर राखले होते.

21 विरोधी पक्षांनी एकत्र येत एसआयआर प्रक्रियेच्या विरोधात मिळून काम करण्याचा निर्णय घेतला आहे. एसआयआर प्रक्रिया भाजपला राजकीय लाभ मिळेल अशाप्रकारे राबविली जातेय. निवडणूक प्रक्रियेशी छेडछाड केली जात असल्याचा आरोप तृणमूल काँग्रेसच्या खासदार सागरिका घोष यांनी केला आहे. यापूर्वी काँग्रेसचे राज्यसभा खासदार आणि पक्षाचे महासचिव जयराम रमेश यांनी एक्सवर पोस्ट करत यासंबंधी माहिती दिली होती. सरन्यायाधीशांना मंगळवारी पाठविण्यात आलेल्या पत्रावर 23 राजकीय पक्षांसोबत एका अपक्ष खासदारानेही स्वाक्षरी केली आहे. विरोधी पक्ष एकजूटता, एकता आणि प्रतिरोधावरून निश्चितपणे मजबूतीने उभे ठाकले असल्याचा दावा रमेश यांनी केला आहे.

### विरोधकांचे आरोप, सरकारची भूमिका

बिहारमध्ये 65 लाख नावं मतदारयादीतून वगळण्यात आली होती. लोकसभेतील विरोधी पक्षनेत्यासमवेत अनेक विरोधी नेत्यांनी एसआयआर प्रक्रियेला विरोध दर्शविला आहे. एसआयआर प्रक्रिया लोकशाहीला कमकुवत करण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप काँग्रेससह अन्य विरोधी पक्षांकडून करण्यात आला आहे. तर एसआयआरचा उद्देश अवैध घुसखोरांची नावे मतदारयादीतून हटविणे असल्याचे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी यापूर्वीच स्पष्ट केले आहे. कुठलाही भारतीय नागरिक मतदारयादीतून वगळला जाणार नसल्याचे शाह यांनी सांगितले आहे.

**एसआयआर प्रक्रिया अन् वाद..** निवडणूक आयोगाने जवळपास एक वर्षापूर्वी मतदार यादीच्या पडताळणीसाठी एसआयआर प्रक्रिया सुरू केली होती. याचा उद्देश मतदार यादी अद्ययावत करणे आहे. तसेच निवडणूक प्रक्रिया मजबूत करणेही याचा उद्देश आहे. बिहारमध्ये 24 जून 2025 रोजी विधानसभा निवडणुकीपूर्वी याचा एक प्रायोगिक टप्पा सुरू झाला होता. या प्रक्रियेत देशभरात मतदार यादीतील जवळपास 6 कोटी नावं हटविण्यात आली आहेत. ही पुनर्परीक्षण प्रक्रिया सध्या 19 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये जारी आहे.

हे पत्र निवडणूक आयोगाची मतदार यादी पुनर्परीक्षण प्रक्रिया आणि निवडणूक संबंधी अन्य मुद्द्यांवर आधारित आहे. या पत्राद्वारे विरोधी पक्षांच्या आघाडीने एसआयआरच्या पालनप्रकरणी न्यायपालिकेने हस्तक्षेप करावा अशी मागणी करण्यात आली आहे.

# पाणी रोखल्यास हात तोडू! पाकिस्तानच्या मंत्र्याची धमकी

■ इस्लामाबाद/वृत्तसंस्था

पाकिस्तानने सिंधू जल करारावरून पुन्हा एकदा भारताला धमकी दिली आहे. पाकिस्तानच्या हिस्स्याचे पाणी कुणी रोखण्याचा प्रयत्न केला तर आम्ही त्याचे हात तोडू, असे तेथील हवामान बदल विषयक मंत्री मुसादिक मलिक यांनी म्हटले आहे. भारत पाकिस्तानच्या हिस्स्याचे पाणी रोखू इच्छित असल्याचा दावाही मलिक यांनी केला आहे.



शेजारी देशाच्या पंतप्रधानांच्या हातात एक नळ आहे, पाकिस्तानात पाण्याचा एक थेंबही जाऊ दिला जाणार नसल्याचे म्हणत आहेत, परंतु जे आमच्या हिस्स्याच्या पाण्यावर दावा करतील, त्यांचे हात आम्ही तोडून टाकू असे मुसादिक मलिक यांनी माहिती मंत्री अताउल्लाह तरार यांच्यासोबतच्या संयुक्त पत्रकार परिषदेत म्हटले आहे. सिंधू जल करार कायदेशीर स्वरुपात अद्यापही लागू आहे. भारत हा करार एकतर्फी स्थगित करू शकत नाही, रद्द करू शकत नाही आणि यात बदलही करू शकत नसल्याचा दावा तरार यांनी केला आहे.

सिंधू जल करारावर पहिले आंतरराष्ट्रीय चर्चासत्र इस्लामाबादमध्ये आयोजित केले जाणार आहे. यात कायदेशीर तज्ज्ञ, जलतज्ज्ञ आणि विदेशी प्रतिनिधी सामील होतील. चर्चासत्रात कराराच्या कायदेशीर आणि तांत्रिक पैलूंवरही चर्चा होणार असल्याचे पाकिस्तानच्या मंत्र्यांनी सांगितले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अंतर्गत पाकिस्तानचे अधिकार सुरक्षित आहेत. पाणी आमची जीवनरेषा आहे आणि हीच आमची रेडलाइन देखील असल्याचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि सैन्यप्रमुख आसीम मुनीर यांनी स्पष्ट केले असल्याचा उल्लेख तरार यांनी केला. पाकिस्तानचे संरक्षणमंत्री ख्वाजा आसिफ यांनी 21 जून रोजी सिंधू जल करार स्थगित करण्यावरून भारताला धमकी दिली होती. आमची जलसुरक्षा धोक्यात आल्याचे वाटताच आम्ही भारताच्या विरोधात युद्ध पुकारू शकतो.

भारत पाकिस्तानच्या हिस्स्याच्या जलप्रवाहात अडथळे निर्माण करत आहे आणि रणनीतिक अस्त्र म्हणून त्याचा वापर करत असल्याचा आरोप आसिफ यांनी केला आहे.

# इराण तणावामुळे भारतीय बाजारात दबाव

■ मुंबई/वृत्तसंस्था

भारतीय भांडवली बाजारात जागतिक पातळीवरील तणावामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी यांचे निर्देशांक नुकसानीसह बंद झाले आहेत. दरम्यान स्मॉलकॅप आणि मिडकॅप यांच्या कामगिरीचाही परिणाम झाल्याचे दिसून आले. मंगळवारच्या सत्तात बाजाराचे लक्ष अमेरिका-इराण तणाव, आशियाई बाजारांमधील हालचाली आणि आयपीओंवर राहिले होते.

शेअर बाजार मंगळवारी सलग दुसऱ्या दिवशी घसरले. आयटी आणि निवडक मोठ्या कंपन्यांमधील विक्रीमुळे सेन्सेक्स 249.70 अंकांनी घसरून 76,478.67 वर बंद झाला. त्याच वेळी, निफ्टी 80.50 अंकांनी घसरून 23,865.75 वर बंद झाला. बाजारात आयशर मोटर्स, इन्फोसिस आणि टाटा कंझ्युमर प्रॉडक्ट्सच्या शेअर्सवर सर्वाधिक दबाव होता.

2026 या कॅलेंडर वर्षाच्या पहिल्या सहामाहीत देखील देशांतर्गत शेअर बाजार दबावाखाली राहिले आहेत. पश्चिम आशियातील सध्याच्या तणावामुळे जागतिक आर्थिक वाढ आणि महागाईबद्दलची चिंता वाढली आहे. यामुळे, या काळात निफ्टी सुमारे 8.6 टक्के आणि सेन्सेक्स 10.2 टक्क्यांनी घसरला. क्षेत्रीय निर्देशांकांबद्दल बोलायचे झाल्यास, आयटी, मीडिया आणि पीएसयू बँक क्षेत्रात सर्वाधिक घसरण नोंदवली गेली. त्याच वेळी, रिअल्टी, ग्राहक टिकाऊ वस्तू आणि रसायन क्षेत्रातील शेअर्समध्ये चांगली खरेदी दिसून आली. एसबीआय सिक्युरिटीजचे टेक्निकल आणि डेरिव्हेटिव्ह रिसर्च प्रमुख, सुदीप शाह यांच्या मते, मासिक एक्स्पायरीच्या दिवशी निफ्टीची सुरुवात कमजोर झाली आणि संपूर्ण ट्रेडिंग सत्रात निर्देशांक दबावाखाली व्यवहार करत राहिला. निफ्टीमधील कंपन्यांमध्ये, मारुती सुझुकीने 5.25 टक्क्यांची वाढ नोंदवली आणि ती सर्वाधिक वाढणारी कंपनी ठरली. यानंतर, टायटन कंपनीने 2.97 टक्के, अदानी एंटरप्रायझेसने 2.49 टक्के, बजाज फायनान्सने 2.32 टक्के आणि टाटा मोटर्स पीव्हीने 2.08 टक्के वाढ नोंदवली.

# आम्ही नाही पाकिस्तानचा भाग; पीओके.मधील जनतेचा आक्रोश

■ मुझफ्फराबाद/वृत्तसंस्था

‘आम्ही पाकिस्तानपासून स्वतंत्र आहोत’, अशी स्पष्ट आणि जाहीर घोषणा पाकिस्तानव्याप्त काश्मीरमधील पाकिस्तानविरोधी आंदोलकांनी केली आहे. पाकिस्तानने आमच्या मागण्या मान्य केल्या नाहीत, तर आमच्यासाठी अन्य मार्ग मोकळे आहेत, असा इशाराही आंदोलकांनी दिला. पाकिस्तानव्याप्त काश्मीरमध्ये गेल्या 15 दिवसांपासून पाकिस्तान प्रशासनाविरोधात उग्र आंदोलन होत आहे.

पाकिस्तान प्रशासनाच्या अन्यायपूर्ण आणि अत्याचारी प्रवृत्तीला कंटाळून या प्रदेशातल्या लोकांनी त्या देशाच्या प्रशासनाविरोधात प्रचंड आंदोलन छेडले आहे. आंदोलकांची गळचेपी करण्यासाठी पाकिस्तान प्रशासनाने या भागाचा अन्नपाण्याचा पुरवठा तोडला आहे. त्यामुळे येथे अन्नधान्ये आणि पाणी यांची प्रचंड टंचाई निर्माण झाली आहे. तथापि, यामुळे दबून न जाता अधिकाधिक संख्येने लोक रस्त्यांवर उतरुन पाकिस्तानच्या क्रूर राजवटीविरोधात आंदोलन करीत आहेत. पाकिस्तानने या भागात अनेक स्थानी लष्कर नियुक्त केले आहे.



### आम्हाला उपकार नकोत

पाकिस्तानचे उपकार आम्हाला नकोत. आम्ही त्यांच्या तुकड्यांवर जगत नाही. त्यांची आम्हाला नव्हे, तर आमची त्यांना आवश्यकता आहे. आमच्या जीवावर पाकिस्तानचे प्रशासन उड्या मारत आहे. त्याची जागा त्याला लवकरच कळून येईल. आमच्या मागण्या मान्य होईपर्यंत आम्ही मागे हटणार नाही, असा इशारा पाकिस्तानव्याप्त काश्मीरचे नेते सरदार अमन खान यांनी प्रशासनाला दिला आहे.

**अन्य मार्ग चोखाळू..** या भागाच्या अन्नपाण्याचा पुरवठा तोडून पाकिस्तानने येथील सर्वसामान्य जनतेवर सूड उगविण्याचा प्रयत्न चालविला आहे. तथापि, आमचा निर्धार कायम असून आम्ही कोणत्याही दबावाखाली येणार नाही. पाकिस्तान प्रशासनाने आमचा अन्न आणि औषधांचा पुरवठा पूर्ववत केला नाही, तर आम्ही अन्य मार्गांनी या जीवनावश्यक वस्तू मिळवून आमच्या जीवांचे रक्षण करू. आम्ही पाकिस्तानसमोर लाचार होणार नाही, अशीही स्पष्टोक्ती अमन खान यांनी केल्याचे वृत्त आहे.

# गावाच्या वेशीवर प्रेमीयुगुलाचे मृतदेह सापडल्याने खळबळ, ऑनर किलिंगचा संशय

**मयिलादुथुराई/वृत्तसंस्था**

तमिळनाडूतील मयिलादुथुराई जिल्ह्यातील सथानागुडी गावाबाहेरील एका गवताच्या शेडमध्ये प्रेमीयुगुल गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली. दोघेही एकमेकांवर प्रेम करत असल्याचे सांगितले जात असून, तरुणाच्या कुटुंबीयांनी हा ऑनर किलिंगचा प्रकार असल्याचा आरोप केला आहे. याप्रकरणी स्थानिक पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलिसांनी पुढील तपासाला सुरुवात केली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना थरंगमबाडीजवळील सथानागुडी गावातील आहे. मृतांची ओळख पार्थिबन (वय,१९) अशी झाली आहे. तर, मुलगी १६ वर्षांची आहे. पार्थिबन हा शेजारच्या पुदुपालयम गावातील रहिवासी असून तो कारागिर म्हणून काम करायचा. तर, मुलीने नुकतीच बारावीची परीक्षा उत्तीर्ण केली होती आणि महाविद्यालयीन प्रवेशाची तयारी सुरू होती. स्थानिकांच्या माहितीनुसार, दोघांमध्ये प्रेमसंबंध होते. या नात्याची माहिती मुलीच्या कुटुंबीयांना मिळाल्यानंतर दोन्ही कुटुंबांमध्ये वाद सुरू झाला. दरम्यान, पहाटे सुमारे तीनच्या सुमारास गावाबाहेरील गवताच्या शेडमध्ये दोघांचे मृतदेह वेगवेगळ्या फासांवर लटकलेल्या अवस्थेत आढळले. घटनेची माहिती मिळताच गावात एकच खळबळ उडाली. स्थानिकांनी पोलिसांना माहिती दिल्यानंतर मोठा पोलीस बंदोबस्त घटनास्थळी दाखल झाला. मृत तरुण आणि मुलगी वेगवेगळ्या समाजातील असल्याने कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली.

पार्थिबनच्या कुटुंबीयांनी हा आत्महत्येचा प्रकार नसून ऑनर किलिंग असल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, दोघांच्या प्रेमसंबंधांना विरोध होत होता आणि त्याच कारणातून त्यांची हत्या करण्यात आली. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. दुसरीकडे, मुलीच्या कुटुंबीयांनी घटनेनंतर दुसऱ्या पक्षातील काही लोकांनी त्यांच्या घरावर आणि वाहनांवर तोडफोड केल्याचा आरोप केला. पोलीस या आरोपांचीही चौकशी करत आहेत. सध्या दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आले असून, मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. शवविच्छेदन अहवाल, न्यायवैद्यक तपास आणि दोन्ही कुटुंबीयांचे जबाब यांचा आधार घेऊन पुढील कारवाई केली जाईल, असे पोलिसांनी सांगितले आहे.

## कौटुंबिक वाद टोकाला गेला, तिघांना पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न

**नागपूर/वृत्तसंस्था**

नागपूरमध्ये तिघांच्या अंगावर पेट्रोल टाकून त्यांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. नागपूर जिल्ह्यातील सावनेर पोलीस स्टेशन हद्दीतील धापेवाडा येथे ही संतापजनक घटना घडली. दोन तरुणींसह तिघांना पेट्रोल टाकून जाळण्याचा प्रयत्न करण्यात आला. - जुन्या कौटुंबिक वादातून नातेवाईकांवर आणि घरात कामासाठी आलेल्या दोन तरुणीना जीवे मारण्याचा प्रयत्न करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी अवघ्या काही तासांत आरोपीला अटक केली.




मिळालेल्या माहितीनुसार, नागपूरच्या कळमेश्वर तालुक्यातील धापेवाडा येथे सोमवारी दुपारी ही घटना घडली. जुन्या कौटुंबिक वादातून नातेवाईकावर तसेच घरात कामासाठी आलेल्या दोन तरुणींवर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला. त्यांच्या अंगावर पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न केला गेला. सावनेर पोलिसांनी अवघ्या काही तासांत आरोपीला अटक केली. धनराज देवनाथ चरवड यांच्या तक्रारीवरुन आरोपी राजू लक्ष्मण बरबड याच्याविरोधात गुन्हा दाखल करत त्याला अटक करण्यात आली.

धनराज चरवड यांच्या तक्रारीनुसार, २९ जून रोजी दुपारी ३ ते ३.३० वाजताच्या सुमारास त्यांचा नातेवाईक राजू लक्ष्मण बरबड (४८ वर्षे) हा सोमवारी घरी त्यांच्या घरी आला. जुन्या कारणावरून त्याने भांडण सुरू केले. या वादातून संतप्त झालेल्या राजूने धनराज बरवड तसेच घरात कामासाठी आलेल्या दोन तरुणींच्या अंगावर पेट्रोल टाकले आणि त्यांना जाळण्याचा प्रयत्न केला. सुदैवाने या घटनेत तिघे किरकोळ जखमी झाले. त्यांच्यावर सध्या रुग्णालयात उपचार करण्यात आले. या घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते.

## काँग्रेस नगरसेविकेच्या पतीवर जीवघेणा हल्ला



**अकोला :** काँग्रेसचे नगरसेविकेच्या पतीवर भर रस्त्यात जीवघेणा हल्ला झालाय. अकोला महापालिकेच्या प्रभाग 17 च्या नगरसेविका 'साफिया बी' यांच्या पतीवर जीवघेणा हल्ला झालाय. अकोला शहरातील रामदास पेठ पोलीस स्टेशन हद्दीत ही घटना घडली आहे. याकूब खान पैलवान असं जखमी झालेल्या नगरसेविका पतीचे नाव आहे. सध्या त्यांची प्रकृती चिंताजनक असून त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. नगरसेवकाच्या पतीवर हल्ला झाल्यानेजिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची माहिती मिळताच काँग्रेसचे पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी हॉस्पिटलसमोर गर्दी केली आहे. हल्लाखोर पळून जात असताना पोलिसांनी त्याला अटक केली आहे.

## शाळेच्या टीसीसाठी शिक्षकावर चाकू हल्ला, विद्यार्थ्यानं ऑनलाईन मागवला होता चाकू

**मुंबई/वृत्तसंस्था**

गेल्या दिवसात चाकू हल्ल्याच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचं दिसत आहे. मागील आठवड्यात मुंबईतील धावत्या लोकल ट्रेनमध्ये एका प्रवाशाने दुसऱ्या प्रवाशाची हत्या केली होती. आरोपीने ऑनलाईनने चाकू खरेदी केल्याची बाब उघडकीस आली होती. आता छत्रपती संभाजीनगरमध्ये एका इंग्रजी शाळेतील शिक्षकावर चाकू हल्ला झाला आहे. हल्ला करणाऱ्या विद्यार्थ्याने ऑनलाइन पद्धतीने चाकू खरेदी केलाय. त्यामुळे ऑनलाईन मिळणाऱ्या धारधार शस्त्रांचा मुद्दा समोर येत आहे.

चाकू हल्ला करणारा हा माजी विद्यार्थी आहे. दरम्यान चाकू हल्ल्यात शिक्षक जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले आहे. हाती आलेल्या माहितीनुसार, चाकू हल्ला करणारा विद्यार्थी हा २०२३मध्ये त्या इंग्रजी शाळेतील विद्यार्थी होता. तो दुसऱ्या ठिकाणी नोकरी लागली आहे, त्यासाठी त्याला शाळा सोडल्याचा दाखल लागत होता.



टीसी म्हणजे शाळा सोडल्याचा दाखल्यावरून शिक्षक आणि त्याच्यात वाद झाला. त्यातून त्याने शिक्षकावर हल्ला केला. याप्रकरणी शहरातील छावणी पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतलंय. विशाल धूशिंग असं शिक्षकाचे नाव असून शासकीय रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यातील आष्टी पोलीस ठाण्याच्या हद्दीत चाकू हल्ल्याची घटना दोन दिवसापूर्वी घडली होती. यात एका व्यक्तीने आपल्या पत्नीवर चाकू हल्ला केला होता. कनिका दास उर्फ कनिका विश्वजीत मंडल असं महिलेचं नाव आहे. त्या चाकू हल्ल्यात गंभीर जखमी झाल्या होत्या. तर ब्रजकेश दास असं आरोपी पतीनचं नाव आहे.

## ५०० गुंतवणूकदारांना 100 कोटींचा गंडा, तिघांचा जामीन फेटाळला

**नागपूर/वृत्तसंस्था**

पैसा कोणाला नकोय, आपल्यातील प्रत्येकाला पैसा हवाय. मात्र हीच पैशाची गरज पाहता सायबर गुन्हेगार दुप्पट परतावा देण्याचं आमिष देत आपल्यातील अनेकांना गंडा घालत आहेत. असेच प्रकरणाने महाराष्ट्रात खळबळ उडून दिली आहे. कमी कालावधीत पैसे दुप्पट करून देण्याचे आकर्षक आमिष दाखवून 500 हून अधिक जणांना गंडा घातल्याचा प्रकार समोर आलाय. दरम्यान याप्रकरणातील संशयित आरोपी अटकेत असून त्याच्या सुनावणीवर न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिलाय.

मुंबई सत्र न्यायालयाने मुख्य संशयित आरोपी अंकित दीपक जैन, ओंकार सिंह आणि हेतुल रांका यांचे जामीन अर्ज फेटाळले आहेत. या महत्त्वपूर्ण निर्णयामुळे आता तपास यंत्रणेचा मार्ग मोकळा झाला आहे. फसवणुकीच्या पैशांचा नेमका कुठे वापर झाला, याचा शोध घेण्यास पुरेसा वेळ मिळणार आहे. या प्रकरणी एफआयआर मुंबई CDB CID क्राइम ब्रँचच्या प्रॉपर्टी सेलमध्ये दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध विविध कलमांसह महाराष्ट्र ठेवीदारांच्या हितसंबंधांचे संरक्षण अधिनियम (MPID Act), १९९९ अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारदारांच्या म्हणण्यानुसार, आरोपींनी नागरिकांना "कमी कालावधीत दुप्पट किंवा मोठा परतावा" मिळेल असे सांगून मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यास सांगितलं. गुंतवणूक सुरक्षित असल्याचे




वारंवार सांगण्यात आले. अनेकांनी आपल्या आयुष्यभराची बचत, निवृत्तीचे पैसे, पीएफ, ग्रॅच्युइटी, एफडी मोडून, तर काहींनी कर्ज काढून या योजनेत पैसे गुंतवले होते. पण ठरलेल्या मुदतीनंतर ना मूळ रक्कम परत मिळाली, ना आश्वासनाप्रमाणे परतावा मिळाला. त्यामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट कोसळले आहे.

तक्रारदारांच्या वतीने बाजू मांडणारे वकील निमेष आर. मेहता यांनी न्यायालयात हा शेकडो गुंतवणूकदारांच्या आयुष्यभराच्या कष्टाच्या पैशांशी संबंधित गंभीर आर्थिक गुन्हा असल्याचे सांगत जामीन अर्जास तीव्र विरोध केला. तपास अद्याप सुरू असून संपूर्ण आर्थिक व्यवहारांचा मागोवा घेणे बाकी असल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आणलं. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि तपासातील कागदपत्रांचा विचार केल्यानंतर मुंबई सत्र न्यायालयाने तिन्ही आरोपींचे जामीन अर्ज फेटाळून लावले.

# पॅराग्वेकडून सर्वात मोठा धक्का, जर्मनी स्पर्धेबाहेर

**फोक्सबोरो, मॅसॅच्युसेट्स/वृत्तसंस्था**

या विश्वचषकात पॅराग्वेसाठी खेळलेल्या आपल्या मागील दोन सामन्यांमध्ये होजे कॅनाले सुरुवातीपासून संघात नव्हता. पण त्याने आपल्या पहिल्याच सामन्यात एक अविस्मरणीय कामगिरी केली. कॅनालेने पहिल्या सडन-डेथ पेनल्टी किकवर गोल केला, ऑर्लांदो गिलने शूटआऊटमध्ये दोन महत्त्वाचे बचाव केले आणि पॅराग्वेने जर्मनीला पेनल्टी शूटआऊटमध्ये 4-3 ने हरवून 2026 च्या विश्वचषकातील सर्वात मोठा अनपेक्षित विजय नोंदवला.

या दक्षिण अमेरिकन देशासाठी हा एक मोठा विजय आहे. एकूण चार वेळा विजेत्या ठरलेल्या आणि 2014 मध्ये शेवटचे विजेतेपद पटकावल्यापासून विश्वचषकात संघर्ष करणाऱ्या जर्मनीसाठी हे स्पर्धेतून बाहेर पडण्याचे आणखी एक धक्कादायक प्रकरण ठरले. विश्वचषकात जर्मनीचा पेनल्टी शूटआउटमध्ये पराभव करणारा पॅराग्वे हा पहिला संघ ठरला. जर्मनीच्या खेळाडूंना




सहापैकी तीन पेनल्टी किक्समध्ये अपयश आले. यात जोनाथन टाहचाही समावेश होता, ज्याने 'सडन-डेथ'च्या पहिल्या फेरीत चेंडू क्रॉसबारच्या वरून मारला, ज्यामुळे कॅनालेसाठी विजयाची संधी निर्माण झाली. टाहच्या या चुकीपूर्वी फॅबियन बाल्बुएनाचा गोल करण्याचा प्रयत्न जर्मन गोलरक्षक मान्युएल न्युअरने हाणून पाडला होता. जर तो प्रयत्न यशस्वी झाला असता, तर पॅराग्वेचा विजय तेव्हाच निश्चित झाला असता.

त्यापूर्वी अतिरिक्त वेळेत आपण आघाडी मिळवून देणारा गोल केला आहे, असे टाहला वाटले होते. 102 व्या मिनिटाला नॅथॅनिएल ब्राउनच्या कॉर्नर किकवर त्याने हेडरद्वारे गोल केला, परंतु व्हिडिओ पुनरावलोकनानंतर पंचांनी असा निष्कर्ष काढला की, चेंडू फटकावण्यापूर्वी वाल्डेमार आंतोननने गोलरक्षक गिलला धक्का देऊन खाली पाडले होते, त्यामुळे तो गोल रद्द करण्यात आला. हा सामना अतिरिक्त वेळेनंतर 1-1 अशा बरोबरीत संपला. पहिल्या सत्राच्या उत्तरार्धात ज्युलिओ एन्सिओने हेडरद्वारे गोल करून पॅराग्वेला आघाडी मिळवून दिली होती, परंतु 52 व्या मिनिटाला काई हाव्हर्ट्झने गोल करत जर्मनीसाठी बरोबरी साधली. आता शनिवारी फिलाडेल्फिया येथे होणाऱ्या 16 संघांच्या फेरीच्या सामन्यात पॅराग्वेचा सामना फ्रान्स आणि स्वीडन यांच्यातील विजेत्याशी होईल. 42 व्या मिनिटाला चेंडूच्या अचूक चालींद्वारे एन्सिओसाठी संधी निर्माण करत पॅराग्वेने सुरुवातीची कोंडी फोडली. यावेळी मिगुएल अल्मिरॉनने डाव्या पायाने माटियास गलार्झाकडे पास देत जर्मनीच्या अलेक्झांडर पावलोविच आणि नॅथॅनिएल ब्राउन यांच्यामधून मार्ग काढला. गलार्झाने एन्सिसोकडे क्रॉस पाठवला. एन्सिसोला जर्मन बचावपटूंनी रोखले नव्हते, त्यामुळे त्याने सहजपणे हेडरद्वारे न्युअरला चकवून गोल केला. दुसऱ्या सत्रात हॅव्हर्ट्झने फ्लोरियन विर्ट्झचा क्रॉस स्वीकारला आणि त्यावर योग्यरीत्या डोक्याचा स्पर्श करून चेंडूची दिशा बदलली, ज्यामुळे तो गोलरक्षक गिलला चकवून जाळ्यात गेला. गट फेरीत सर्वाधिक 10 गोल करणाऱ्या संघांपैकी एक असलेल्या जर्मनीला पॅराग्वेच्या 4-5-1 या बचाव-प्रधान रचनेला भेदणे कठीण गेले. पहिल्या सत्रामध्ये चेंडूवर जर्मनीचे 78 टक्के नियंत्रण होते.

### पॅराग्वेने 24 वर्षांनंतर काढला वचपा

यापूर्वी जर्मनीने प्रमुख स्पर्धांमधील सातपैकी सहा पेनल्टी शूटआउट्स जिंकले होते. 1976 च्या युरोपियन चॅम्पियनशिपच्या अंतिम सामन्यात झेकोस्लोव्हाकियाकडून पराभव पत्करल्यानंतर त्यांनी सलग सहा शूटआउट्स जिंकले होते. तसेच या दोन संघांमधील विश्वचषकातील एकमेव मागील सामन्यात 2002 च्या स्पर्धेत 16 संघांच्या फेरीत जर्मनीने पॅराग्वेचा 1-0 असा पराभव केला होता. जवळपास 24 वर्षांनंतर पॅराग्वेने त्या पराभवाचा बदला घेतला.

# ऑस्ट्रेलियन महिला आठव्यांदा अंतिम फेरीत

## विंडीज महिलांचा ८ गड्यांनी दणदणीत पराभव, बेथ मुनीचे नाबाद अर्धशतक

**ओव्हल/वृत्तसंस्था**

2026 च्या आयसीसी टी-20 महिलांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत बलाढ्या ऑस्ट्रेलियन संघाने मंगळवारच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात विंडीजचा 42 चेंडू बाकी ठेवून 8 गड्यांनी दणदणीत पराभव करत आठव्यांदा अंतिम फेरीत प्रवेश मिळविला. ऑस्ट्रेलियाच्या बेथ मुनीने नाबाद अर्धशतक (61) धावा झळकविल्या.



आतापर्यंत पाचवेळा या स्पर्धेचे विजेतेपद मिळविणारा ऑस्ट्रेलियन महिला संघ आता सहाव्या जेतेपदाच्या समीप पोहोचला आहे. या स्पर्धेतील दुसरा उपांत्य फेरीचा सामना इंग्लंड आणि द. आफ्रिका यांच्यात गुरुवारी खेळविला जाणार असून अंतिम सामना रविवार दि. 5 जुलै रोजी होणार आहे. मंगळवारच्या पहिल्या उपांत्य सामन्यात ऑस्ट्रेलियाने नाणेफेक जिंकून विंडीजला प्रथम फलंदाजी दिली. विंडीजने 20 षटकांत 7 बाद 125 धावांपर्यंत मजल मारली. त्यानंतर ऑस्ट्रेलियाने 13 षटकांत 2 गड्यांच्या मोबदल्यात 127 धावा जमवित हा सामना एकतर्फी जिंकला.

विंडीजच्या डावात कर्णधार मॅथ्युजने 28 चेंडूत 5 चौकारांसह 30, कॅम्पबेलने 25 चेंडूत 3 चौकारांसह 22, जोसेफने 22 चेंडूत 1 षटकारासह 16, हेन्रीने 1 चौकारासह 10, ग्लास्गोने 1 चौकारासह 15 आणि डॉटिनने 16 चेंडूत 4 चौकारांसह नाबाद 26 धावा जमविल्या. विंडीजच्या डावात 1 षटकार आणि 14 चौकार नोंदविले गेले. ऑस्ट्रेलियातर्फे मॉलीन्युक्स, गार्डनर आणि वेअरहॅम यांनी प्रत्येकी 2 तर सदरलँडने 1 गडी बाद केला.

प्रत्युत्तरादाखल खेळताना ऑस्ट्रेलियाच्या डावात सलामीच्या जॉर्जिया व्हॉलने 11 चेंडूत 1 षटकार आणि 2 चौकारांसह 16 धावा जमविताना बेथ मुनी समवेत सलामीच्या गड्यासाठी 18 चेंडूत 29 धावांची भर घातली. हेन्रीने व्हॉलला त्रिफळाचीत केले. मॅथ्युजने लिचफिल्डला केवळ 4 धावांवर पायचीत केले. एलीस पेरीला दुखापत झाल्याने ती 2 धावांवर असताना निवृत्त झाली. ऑस्ट्रेलियाने यावेळी 2 बाद 64 धावा जमविल्या होत्या.

बेथ मुनी आणि गार्डनर या जोडीने तिसऱ्या गड्यासाठी अभेद्य 63 धावांची भागिदारी करत आपल्या संघाला मोठा विजय मिळवून दिला. मुनीने 36 चेंडूत 8 चौकारांसह नाबाद 61 तर गार्डनरने 20 चेंडूत 1 षटकार आणि 4 चौकारांसह नाबाद 35 धावा जमविल्या. ऑस्ट्रेलियाच्या डावात 2 षटकार आणि 14 चौकार नोंदविले गेले. ऑस्ट्रेलियाने पॉवरप्ले दरम्यानच्या 6 षटकांत 63 धावा जमविताना 2 गडी गमविले. मुनीने 29 चेंडूत 7 चौकारांसह अर्धशतक झळकविले. विंडीजतर्फे हेन्री आणि मॅथ्युज यांनी प्रत्येकी 1 गडी बाद केला.

# सिनर, साबालेंका, जोकोविच, अँड्रीव्हा, ओसाका यांची विजयी सलामी

**लंडन/वृत्तसंस्था**

2026 च्या विम्बल्डन ग्रँडस्लॅम टेनिस स्पर्धेत पुरूषांच्या विभागात इटलीचा विद्यमान विजेता जेनिक सिनर, सर्बियाचा माजी टॉपसिडेड नोव्हॅक जोकोविच, तसेच महिलांच्या विभागात बेल्जियमची आर्यना साबालेंका, रशियाची मायरा अँड्रिव्हा, ॲनिसिमोव्हा, अमेरिकेची कोको गॉफ, जपानची नाओमी ओसाका, अमेरिकेची जेसिका पेगुला यांनी विजयी सलामी दिली. पुरूषांच्या विभागात रशियाचा 12 वा मानांकीत आंद्रे रुबलेव, पोलंडची माया श्वालिन्स्का व मॅग्डा लिनेट यांचे आवाहन पहिल्याच फेरीत समाप्त झाले.



पुरूषांच्या विभागातील पहिल्या फेरीतील सामन्यात इटलीच्या विद्यमान विजेत्या जेनिक सिनरला विजयासाठी 5 सेट्समध्ये झगडावे लागले. या सामन्यात सिनरने केसमानोव्हीचचा 4-6, 6-3, 6-7 (6-8), 6-2, 6-3 अशा सेट्समध्ये पराभव केला. हा सामना सुमारे साडेतीन तास चालला होता. पुरूषांच्या विभागातील अन्य एका सामन्यात सर्बियाच्या जोकोविचने चीनच्या यु इलेकचा 6-4, 5-7, 6-4, 6-4 असा पराभव करत विजयी सलामी दिली. मात्र रशियाच्या बाराव्या मानांकीत आंद्रे रुबलेवचे आव्हान पहिल्याच फेरीत रोमन सैफुलीनने संपुष्टात आणले. सैफुलीनने झुंजार लढतीत रुबलेवचा 6-4, 6-7 (6-8), 3-6, 6-3, 7-6 (12-10) असा पराभव केला. पहिल्या फेरीतील अन्य एका सामन्यात स्पेनच्या राफेल जोडारने या स्पर्धेत पहिल्यांदाच आपला सहभाग दर्शविताना फेलिक्स गिलचे आव्हान 6-3, 6-3, 7-5 असे संपुष्टात आणले.

# मोरोक्कोची पेनल्टी शूटआऊटमध्ये नेदरलँड्सवर ३–२ ने मात

**ग्वादालुपे, मेक्सिको/वृत्तसंस्था**

इस्माईल सायबारीने पेनल्टी शूटआऊटमध्ये निर्णायक गोल केला आणि सोमवारी रात्री 1-1 अशा बरोबरीनंतर मोरोक्कोने नेदरलँड्सला 3-2 ने हरवून विश्वचषकातून लवकर बाहेर रवाना करताना एका धक्कादायक निकालाची नोंद केली.

चार फेऱ्यांनंतर शूटआऊट 2-2 असे बरोबरीत असताना मोरोक्कोचा गोलरक्षक यासिन बोनूने क्रिसेन्सियो समरविलेचा प्रयत्न आपल्या डाव्या हाताने जोरदार पद्धतीने अडवला. त्यानंतर सायबारीने गोलरक्षक बार्ट वर्ब्रुगेन दुसऱ्या दिशेने जात असताना डाव्या कोपऱ्यात चेंडू हाणून विजयी गोल केला. त्यापूर्वी शूटआऊटमध्ये मोरोक्को 1-0 ने मागे असताना वर्ब्रुगेनने सौफियान रहिमीचा एक प्रयत्न अडवल्यासारखे वाटले होते, परंतु गोलरक्षकाला चेंडू नीट पकडता आला नाही आणि त्याच्या पायाच्या मागच्या बाजूला लागून तो गोल रेषेच्या



पलीकडे गेला. या सामन्यात बराच काळ मोरोक्कोचे वर्चस्व राहिले, तर नेदरलँड्सने प्रतिहल्ल्यांवर भर दिला. नेदरलँड्ससाठी कोडी गॅकपोने 72 व्या मिनिटाला गोल केला. समरविलेच्या पासवर हा गोल झाल्यानंतर डच संघातील खेळाडू आणि प्रशिक्षक मैदानात धावत आले आणि त्यांनी 27 वर्षीय गॅकपोला मिठी मारली. यावेळी गॅकपो भावूक होऊन रडू लागला. गॅकपो आणि त्याची जोडीदार नोआ व्हॅन डर बिज यांनी नुकतेच त्यांचे बाळ गमावल्याचे जाहीर केले होते.

91 व्या मिनिटाला मोरोक्कोच्या इस्सा डिओपने गोल करून सामना बरोबरीत आणला. डाव्या बाजूला सुमारे 28 यार्ड अंतरावरून चेम्सदिन तालबीने 'बॉक्स'मध्ये एक उंच 'क्रॉस' मारला, ज्यावर डिओपने अचूक हेडर लगावला. गोलरक्षक वब्रुगेनला तो रोखण्याची कोणतीही संधी मिळाली नाही. 'एस्तादियो बीबीव्हीए' येथे खेळल्या गेलेल्या 30 मिनिटांच्या अतिरिक्त वेळेत दोन्हीपैकी कोणत्याही संघाला गोल करण्याची ठोस संधी मिळाली नाही.

अतिरिक्त वेळेच्या उत्तरार्धात नेदरलँड्सचे मुख्य प्रशिक्षक रोनाल्ड कोमन यांनी बदली खेळाडू म्हणून जस्टिन क्लुइव्हर्टला मैदानात उतरवले. पेनल्टी शूटआउटमध्ये गोल करण्यात अपयशी ठरलेल्या तीन डच खेळाडूंपैकी क्लुइव्हर्ट एक होता. कोमन म्हणाले की, मी जस्टिनला बदली खेळाडू म्हणून मैदानात आणले, कारण पेनल्टी शूटआउटमध्ये तो सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक आहे. पण त्याची पेनल्टी हुकली आणि ही गोष्ट त्याच्यासाठी आणि आमच्यासाठी अधिकच वेदनादायी ठरली.

### नेदरलँड्स सलग तिसऱ्यांदा पेनल्टी शूटआऊटवर बाहेर

नेदरलँड्सने यापूर्वी 11 विश्वचषकांमध्ये किमान 16 संघांच्या फेरीपर्यंत मजल मारली होती. यात चार वर्षांपूर्वी कतारमध्ये खेळलेल्या उपांत्यपूर्व फेरीचाही समावेश होतो. सदर स्पर्धेत मोरोक्कोने ऐतिहासिक कामगिरी करत उपांत्य फेरी गाठली होती. पेनल्टी शूटआउटमध्ये नेदरलँड्स विश्वचषकातून बाहेर पडण्याची ही सलग तिसरी वेळ आहे. तसेच या स्पर्धेतील शूटआउटने संपलेला हा दुसरा सामना आहे. आता मोरोक्कोचा सामना शनिवारी ह्युस्टन येथे सहयजमान कॅनडाविरुद्ध सोळा संघांच्या फेरीमध्ये होणार आहे. मोरोक्कोने याआधी 2022 च्या विश्वचषकाच्या गट फेरीत कॅनडाचा 2-1 असा पराभव केला होता.

# संजय दत्तने का सोडला 'वेलकम टू द जंगल' चित्रपट? शूटिंग करूनही घेतला काढता पाय

हिंदी सिनेसृष्टीत सध्या अक्षय कुमारच्या 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटाची जोरदार चर्चा आहे. अलिकडेच २६ जून रोजी अवघ्या काही दिवसांतच या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर आपला दबदबा निर्माण केला आहे. हा चित्रपट चर्चेत असण्याचं दुसरं कारण म्हणजे यातील स्टारकास्ट. जवळपास ३० हून अधिक कलाकार या चित्रपटात झळकले आहेत. यापैकी काही असे कलाकार सुद्धा आहेत ज्यांची नावं चित्रपटाची घोषणा झाल्यानंतर समोर आली होती. मात्र, प्रत्यक्षात चित्रपटातून हे कलाकार गायब असल्याचं पाहायला मिळालं. यामध्ये संजय दत्त, शरीब हाश्मी, राहुल देव आणि गायक मिका सिंग या कलाकारांचा समावेश आहे.

त्यात आता चित्रपटाचे दिग्दर्शक अहमद खान यांनी या सगळ्या चर्चांवर मौन सोडलं असून, संजय दत्तने चित्रपट सोडण्यामागील खरं कारणही सांगितलं आहे. संजय दत्तने 'वेलकम टू द जंगल' या चित्रपटासाठी त्याने शूटिंग सुरू केलं होतं, नंतर त्याने हा सिनेमा मधेच सोडला. त्यामुळे दिग्दर्शक अहमद खान आणि संजूबाबा यांच्यामध्ये काहीतरी बिनसलंय अशा चर्चा



जोर धरू लागल्या. त्याचबरोबर संजय दत्तच्या तारखा मॅच होत नसल्यामुळे त्याने या प्रोजेक्टमधून काढता पाय घेतल्याचं बोललं गेलं. अशातच, अहमद खान यांनी या सगळ्या चर्चांना पूर्णविराम देत संजय दत्तने सिनेमा सोडण्याचं खरं कारण सांगितलं आहे. ते म्हणाले, "संजू बाबाला स्क्रिप्ट खूप आवडली होती आणि त्याला या चित्रपटाचा भाग होण्याची खूप इच्छा होती. अक्षय कुमार आणि जॅकी श्रॉफ यांसारखे त्यांचे अत्यंत जवळचे मित्र या प्रोजेक्टमध्ये आहेत. हे ऐकून तो खूप उत्साही होता.

मग पुढे ते म्हणाले, "आम्ही त्याच्यासोबत चित्रपटातील काही सीन्स देखील शूट केले होते. मात्र, त्याला तारखांची अडचण येत होती. कारण त्याला उपचारांसाठी अमेरिकेला जायचं होतं. शिवाय मी इतक्या कलाकारांच्या वेळापत्रकात बदल करणं सोपं नव्हतं." या मुलाखतीत अहमद खान यांनी सांगितलं की, चित्रपट सोडल्यानंतर संजय दत्तने निर्मात्यांची खूप मदत केली. अहमद खान म्हणाले, "संजय दत्तने स्वतः सुनील शेट्टीला फोन केला आणि या भूमिकेसाठी त्याला तयार केलं. त्यानंतर त्याने जॅकी श्रॉफ यांच्याशी देखील संपर्क साधला आणि त्यांनी सुनील शेट्टीची भूमिका साकारण्यासाठी राजी केलं.आम्ही त्यांच्या या पाठिंब्याबद्दल सदैव आभारी राहू." अशा भावना अहमद खान यांनी व्यक्त केल्या.

'वेलकम टू द जंगल' या चित्रपटात एकूण ३४ कलाकार मुख्य भूमिकेत आहेत. चित्रपटात अक्षय कुमार, सुनील शेट्टी, अर्शद वारसी, परेश रावल, जॉनी लीव्हर,दिशा पटानी, जॅकलिन फर्नांडिस, रवीना टंडन, लारा दत्ता, राजपाल यादव, श्रेयस तळपदे, तुषार कपूर, कृष्णा अभिषेक, किकू शारदा, दलेर मेहंदी यांसारख्या कलाकारांची फौज चित्रपटात आहे.

## ज्येष्ठ दिग्दर्शिका काळाच्या पडद्याआड

मराठी रंगभूमीला आधुनिक विचार, प्रयोगशीलता आणि शिस्तीची नवी दिशा देणाऱ्या ज्येष्ठ दिग्दर्शिका, अभिनेत्री आणि नाट्यप्रशिक्षक विजया मेहता यांचे वयाच्या ९२व्या वर्षी निधन झाले. मुंबईतील राहत्या घरी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनामुळे मराठी नाट्यविश्वावर शोककळा पसरली असून, रंगभूमीने आपल्या एका युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्वाला गमावले आहे.



४ नोव्हेंबर १९३४ रोजी बडोदा येथे जन्मलेल्या विजया मेहता यांचे पूर्वीचे नाव विजया जयवंत होते. मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्राची पदवी घेतल्यानंतर त्यांनी नाट्यक्षेत्रात प्रवेश केला. पुढे दिल्लीतील National School of Drama येथे त्यांनी नाट्यशिक्षण घेतले. प्रख्यात नाट्यगुरू इब्राहिम अल्काझी यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अभिनय आणि दिग्दर्शनाची भक्कम पायाभरणी केली. मराठी रंगभूमीवर 'बाई' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या विजया मेहता यांनी 'रंगायन' या नाट्यचळवळीची स्थापना करून प्रायोगिक रंगभूमीला नवे परिमाण दिले. त्यांच्या शिस्तबद्ध प्रशिक्षणातून विक्रम गोखले, नाना पाटेकर, नीना कुलकर्णी यांच्यासह अनेक दिग्गज कलाकार घडले. रंगमंचावरील प्रत्येक घटकाचा बारकाईने विचार करणाऱ्या दिग्दर्शिका म्हणून त्यांची ओळख होती. अभिनेत्री म्हणून त्यांनी 'झुंजारराव', 'संशयकल्लोळ', 'तुझे आहे तुजपाशी' आणि 'सुंदर मी होणार' यांसारख्या नाटकांत प्रभावी भूमिका साकारल्या. दिग्दर्शिका म्हणून 'संध्याछाया', 'हमीदाबाईची कोठी', 'बॅरिस्टर', 'सावित्री', 'पुरुष', 'वाडा चिरेबंदी' यांसारख्या गाजलेल्या नाटकांना त्यांनी नवे कलात्मक रूप दिले. भारतीय रंगभूमीबरोबरच जर्मनीतही 'मुद्राराक्षस', 'शाकुंतल', 'हयवदन' आणि 'नागमंडल' यांसारख्या नाटकांचे यशस्वी प्रयोग सादर करून त्यांनी भारतीय नाट्यकलेची जागतिक स्तरावर ओळख निर्माण केली. विशेष म्हणजे 'झिम्मा : आठवणींचा गोफ' हे त्यांचे आत्मचरित्रही रसिकांनी मोठ्या प्रमाणावर वाचले.

## मराठी – हिंदी चित्रपटांमध्ये पुन्हा तगडी टक्कर; एकाच दिवशी रिलीज होणार 'हे' ४ सिनेमे

नवीन महिन्यात पहिल्याच आठवड्यात मराठी आणि हिंदी चित्रपटांमध्ये तगडी टक्कर पाहायला मिळणार आहे. एकाच दिवशी म्हणजे ३ जुलै २०२६ ला (शुक्रवारी) २ मराठी आणि २ हिंदी चित्रपट रिलीज होत आहेत.

आलिया भट्ट आणि शर्वरी वाघचा अल्फा चित्रपट ॲक्शन, स्पाय, थ्रिलर आहे. 'अल्फा' हा यशराज फिल्म्सचा चित्रपट आहे.'अल्फा' चित्रपटात आलिया भट्ट आणि शर्वरी वाघ ॲक्शन मोडमध्ये पाहायला मिळणार आहे. 'अल्फा' हा भारतातील पहिला महिला-प्रधान ॲक्शन चित्रपट आहे. चित्रपटात हृतिक रोशन एका दमदार कॅमिओमध्ये दिसणार आहे.




'बेबी डू डाय डू' हा क्राइम, ॲक्शन चित्रपट आहे. हा चित्रपट बेबी कर्मारकर नावाच्या एका सामान्य कर्णबधिर-मूक एनजीओ कार्यकर्तीची कथा आहे. जी गुप्तपणे मुंबईत एक निर्दयी सुपारी किलर म्हणून काम करते. चित्रपटात हुमा कुरैशी मुख्य भूमिकेत झळकली आहे.

'मर्दिनी' चित्रपट एका आईवर आहे, जी आपल्या मुलीसाठी कोणतेही धाडस करू शकते. 'ज्याला आई मारी, त्याला कोण तारी' ही टॅगलाईन खूप प्रसिद्ध झाली. या चित्रपटात आईच्या भूमिकेत मराठी अभिनेत्री प्रार्थना बेहेरे आणि मुलीच्या भूमिकेत बाल कलाकार मायरा वायकुळ झळकणार आहे.

आऊट ऑफ सिलेबस: पुस्तकांच्या पलीकडे' हा चित्रपट MPSC (महाराष्ट्र लोकसेवा आयोग) परीक्षेची तयारी करणाऱ्या तरुणांच्या संघर्षावर आधारित आहे. चित्रपटात अभिनेता अजिंक्य राऊत, अभिनेत्री अद्वयी मुख्य भूमिकेत झळकणार आहेत.

'नागबंधम: द सीक्रेट ट्रेजर' हा साऊथ चित्रपट आहे. हा चित्रपट तेलुगू आणि हिंदीत डब होणार आहे. हा पौराणिक कथा आणि इतिहासावर आधारित एक भव्य ॲक्शन-ॲडव्हेंचर चित्रपट आहे. ही कथा एका योद्ध्याभोवती फिरते.

# "आम्ही फार संपर्कात नाही...", वडील गिरीश ओक यांच्यासोबतच्या नात्याबद्दल पहिल्यांदाच बोलली गिरिजा

नॅशनल क्रश गिरिजा ओक ही मराठीतील लोकप्रिय अभिनेत्री. वडील गिरिश ओक यांच्या पावलावर पाऊल ठेवत गिरिजानेही कलाविश्वात करिअर करण्याचा निर्णय घेतला. गिरिजा एक उत्तम अभिनेत्री असून अनेक मालिका, सिनेमांमध्ये तिने काम केलं आहे. 'भारत भाग्य विधाता' या सिनेमामुळे गिरिजा सध्या चर्चेत आहे. गिरिजाने नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत पहिल्यांदाच गिरिश ओक यांच्यासोबतच्या नात्याबद्दल भाष्य केलं.

लाखतीत ती म्हणाली, "मी लहान असताना माझ्या बाबांची खूप मोठी फॅन होते. माझ्या बाबांची सगळी नाटकं मी पाठ होईपर्यंत पाहिली आहेत.



प्रत्येक नाटकाचे मी २०-२० प्रयोग बघितले आहेत. मी त्यांची सगळी नाटकं पाहिली आहेत. कुसुम मनोहर लेले नाटकाचे माझे सगळे डायलॉग पाठ होते. इतकं ते नाटक मला आवडायचं. त्याच्यामध्ये त्यांनी व्हिलनचा रोल केलेला मला आवडायचं नाही. बाबांचं काम बघतच मी मोठी झालीये. कालांतराने माझे आईबाबा वेगळे झाले आणि मी माझ्या आईसोबत राहू लागले. त्यामुळे त्यांच्यासोबत फारसा संपर्क आला नाही. अजूनही एक कलाकार म्हणून माझ्या मनात त्यांच्याविषयी प्रचंड आदर आहे. त्यांनी जे काही आत्तापर्यंत काम केलंय आणि जे काही मिळवलंय ते स्व:कष्टाने मिळवलं आहे. त्यामुळे मला त्यांचा अभिमान आणि आदर आहे".

"पण, तसे आम्ही फारसे संपर्कात नाही आहोत. आता त्यांचंही एक कुटुंब आहे. त्यांची बायको आहे, मुलगी आहे. फॅमिली एकत्र आली तेव्हा आम्ही एकमेकांसमोर येतो. पण, तसं फारसं बोलणं होत नाही. मलाही माझं आयुष्य आहे. लग्नानंतर मीदेखील माझ्या आयुष्यात बिझी झाले. पण, एक कलाकार म्हणून मला अजूनही असं वाटतं की त्यांच्यात अजूनही खूप काही आहे जे ते या रंगभूमीला देऊ शकतात. आणि ते अजूनही काम करत आहेत. आजही मला खूप लोक येऊन भेटतात आणि सांगतात की तुम्ही गिरीष ओक यांची मुलगी आहात, तेव्हा मला खूप छान वाटतं. की अजूनही मला त्यांची मुलगी म्हणून ओळखलं जातं. नंतर ते असंही म्हणतात की तुमच्या वडिलांसारखं आम्हाला तुमचंही कौतुक वाटतं. तेव्हा मला अजून भारी वाटतं", असंही तिने सांगितलं.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महाकर्जमुक्ती योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना दिलासा लाभ मिळेपर्यंत व्याज आकारू नयेत; शासनाचे स्पष्ट आदेश

**बुलढाणा/बुलढाणा**


राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांना आणखी एक मोठा दिलासा देण्यात आला आहे. योजनेचा प्रत्यक्ष लाभ शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात जमा होईपर्यंत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका तसेच विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी पात्र थकीत पीककर्जाच्या रकमेवर कोणत्याही प्रकारची व्याज आकारणी करू नये, असे स्पष्ट आदेश सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने जारी केले आहेत. मंत्रिमंडळाने मंजूर केलेल्या कर्जमुक्ती योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. शासन निर्णयानुसार ३० जून २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पात्र पीककर्जे या योजनेसाठी ग्राह्य धरण्यात आली आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ मिळणार असून, दोन लाख रुपयांपेक्षा अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना अतिरिक्त रक्कम भरल्यानंतर एकवेळ समजोता () योजनेचा लाभ मिळणार आहे. तसेच नियमित पीककर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभही देण्यात येणार आहे. या योजनेत अल्पमुदतीची पीककर्जे तसेच पुनर्गठित आणि फेरपुनर्गठित पीककर्जांचाही समावेश करण्यात आला आहे. योजनेच्या अंमलबजावणीसाठी मानक कार्यपद्धती () निश्चित करण्यात आली असून, पात्र कर्जखात्यांची माहिती संगणकीय प्रणालीवर अपलोड करणे, कर्जखात्यांचे पडताळणीकरण, आधार प्रमाणीकरण आणि त्यानंतर कर्जमाफीची रक्कम संबंधित कर्जखात्यात हस्तांतरित करण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. शासनाने नमूद केले आहे की, ही संपूर्ण प्रक्रिया पूर्ण होण्यासाठी काही कालावधी लागणार आहे. त्यामुळे कर्जमाफीची रक्कम प्रत्यक्ष खात्यात जमा होण्यापूर्वी शेतकऱ्यांच्या कर्जावर व्याज आकारल्यास त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू शकतो. ही बाब लक्षात घेऊन पात्र शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी लाभ मिळेपर्यंत थकीत पीककर्जाच्या रकमेवर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. या आदेशामुळे पात्र शेतकऱ्यांच्या थकबाकीत अनावश्यक वाढ होणार नसून, कर्जमुक्तीनंतर त्यांना नव्याने पीककर्ज उपलब्ध होण्याचाही मार्ग अधिक सुलभ होणार आहे. कर्जमुक्ती योजनेची पारदर्शक आणि परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी राज्यातील सर्व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांनी या आदेशाची तातडीने अंमलबजावणी करावी, असे शासनाने स्पष्ट केले आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मधील कलम ७९अ अंतर्गत लोकहिताच्या दृष्टीने हा आदेश जारी करण्यात आला असून, योजनेतील कर्जमुक्ती व एकवेळ समजोता () योजनेस पात्र असलेल्या शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळेपर्यंत पात्र थकीत कर्जावर व्याज आकारणी न करण्याचे निर्देश सर्व संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत.

# ३०० कोटी वृक्ष लागवड मोहीम; दिलेल्या उद्दिष्टांचे विभागांनी अचूक नियोजन करा: अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे

**जनसंचलन/बुलढाणा**

शासनाच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी असलेल्या ३०० कोटी वृक्ष लागवड मोहिमेअंतर्गत जिल्ह्याला मिळालेले उद्दिष्ट यशस्वी करण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी काटेकोर आणि अचूक नियोजन करावे, असे निर्देश अपर जिल्हाधिकारी सुधीर खांदे यांनी दिले आहेत. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते. या बैठकीला उपजिल्हाधिकारी डॉ. जयश्री ठाकरे, सामाजिक वनीकरणचे उपवनसंरक्षक विपुल राठोड, तसेच ऑनलाइन मुख कार्यकारी अधिकारी गुलाब खरात, उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी, तहसीलदार आदी उपस्थित होते. राज्यात पर्यावरण संतुलनासाठी आणि हरित आच्छादन वाढवण्यासाठी शासनाने एक अत्यंत महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेतली आहे. या अंतर्गत वर्ष २०४७ पर्यंत ३०० कोटी वृक्षलागवड करण्याचे मुख्य उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जिल्ह्यासाठी दरवर्षी १० लाख वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून संबंधित विभागाना दिलेले उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी गतीने कामाला लागणे आवश्यक आहे. वृक्ष लागवड ही पूर्णपणे डिजिटल आधारित वृक्षारोपण असणार आहे. लावण्यात येणाऱ्या प्रत्येक वृक्षाचे जिओ टॅगिंग (-) व नियमित देखरेख केली जाणार आहे. वृक्षांचे जिओ टॅगिंग होणार असल्याने प्रत्येक विभागाने व नागरिकाने अत्यंत काळजीपूर्वक वृक्षारोपण करावे, अशा सूचना अपर जिल्हाधिकारी यांनी दिल्या. वृक्ष लागवडीदरम्यान केवळ स्थानिक प्रजातींच्या वृक्षांचीच लागवड करण्यात यावी, जेणेकरून त्यांचे संवर्धन सहज होईल. ही लागवड प्रामुख्याने अकृषक पडिक जमिनीवर केली जाणार असून, यासाठी स्वतंत्र लँड बँक तयार करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. लागवडीसाठी पुरेशा प्रमाणात रोपे उपलब्ध आहेत. शहरी भागांमध्ये हरित शहर ( ) ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी संबंधित विभागांनी विशेष नियोजन करावे. तसेच शासनाच्या या मोहिमेला गती देण्यासाठी व्हीबी-जी राम जीच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर वृक्ष लागवड करून घ्यावी. शासनाचा हा महत्त्वाकांक्षी उपक्रम लोकचळवळ व्हावा आणि दिलेले लक्ष्य पूर्ण व्हावे, यासाठी सर्व यंत्रणांनी आपापल्या विभागाचे चोख नियोजन करावे, असे आवाहन बैठकीत करण्यात आले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरु




**जनसंचलन-बुलढाणा**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिपत्याखालील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, बुलढाणा येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी रिक्त जागांवर प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. प्रवेश इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज करावा, असे आवाहन वसतिगृहाचे गृहपाल एस. ई. गारमोडे यांनी केले आहे. शालेय विभाग, कनिष्ठ महाविद्यालय विभाग तसेच बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज सादर करावेत. ऑनलाइन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रत डाउनलोड करून आवश्यक कागदपत्रांसह संबंधित वसतिगृह कार्यालयात ऑफलाइन स्वरूपात जमा करणे बंधनकारक आहे. वसतिगृहातील उपलब्ध रिक्त जागांसाठी ही प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत असून, जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या सुविधेचा लाभ घ्यावा. तसेच प्रवेश प्रक्रियेबाबत अधिक माहितीसाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, बुलढाणा कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही आवाहन करण्यात आले आहे.

# कृषी पायाभूत सुविधा निधी योजनेसाठी २० जुलैपर्यंत विशेष अंमलबजावणी मोहीम

**जनसंचलन/बुलढाणा**

कृषी पायाभूत सुविधा उभारणीला चालना देण्यासाठी भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या कृषी पायाभूत सुविधा निधी ( -) योजनेअंतर्गत राज्यात २० जुलै २०२६ पर्यंत विशेष अंमलबजावणी मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेद्वारे पात्र शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि कृषी उद्योजकांपर्यंत योजनेचा लाभ पोहोचविण्यावर भर दिला जाणार आहे. आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत ऑगस्ट २०२० मध्ये सुरू करण्यात आलेल्या या योजनेद्वारे पिक काढणीनंतरच्या कृषी पायाभूत सुविधा तसेच सामुदायिक शेतीसाठी आवश्यक सुविधांच्या उभारणीसाठी सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करून दिले जाते. यामुळे शेतमालाची साठवणूक, प्रक्रिया, मूल्यवर्धन, वाहतूक आणि विपणन व्यवस्था अधिक सक्षम होऊन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत होत आहे. योजनेअंतर्गत बँकांकडून मंजूर होणाऱ्या दोन कोटी रुपयांपर्यंतच्या कर्जावर तीन टक्के व्याज सवलत तसेच क्रेडिट गॅरंटीची सुविधा शासनामार्फत उपलब्ध करून दिली जाते. गोदामे, शीतगृहे (कोल्ड स्टोरेज), पॅक हाऊस, ग्रेडिंग व सॉर्टिंग युनिट, प्राथमिक प्रक्रिया केंद्रे, कृषी लॉजिस्टिक्स, सायलो, रिपनिंग चेंबर, ई-मार्केट सुविधा, जैव-इनपुट उत्पादन युनिट, कस्टम हायरिंग सेंटर आदी कृषी पायाभूत सुविधा प्रकल्पांना या योजनेत प्राधान्य देण्यात आले आहे. या योजनेचा लाभ वैयक्तिक शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपनी (एफपीओ), प्राथमिक कृषी पतसंस्था (), सहकारी संस्था, कृषी उद्योजक, स्टार्टअप्स, स्वयं सहाय्यता गट () तसेच कृषी क्षेत्रातील इतर पात्र संस्थांना घेता येणार आहे. विशेष मोहिमेदरम्यान जिल्हास्तरावर जनजागृती कार्यक्रम, शेतकरी मेळावे, कार्यशाळा, बँक समन्वय



बैठका आणि लाभार्थी मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. इच्छुक लाभार्थ्यांनी अधिक माहितीसाठी संबंधित तालुका कृषी अधिकारी, आत्मा (), कृषी विभाग किंवा जवळच्या राष्ट्रीयीकृत अथवा अनुसूचित बँकेशी संपर्क साधावा. पात्र शेतकरी, शेतकरी उत्पादक कंपन्या, सहकारी संस्था आणि कृषी उद्योजकांनी कृषी पायाभूत सुविधा उभारणीसाठी या योजनेचा लाभ घ्यावा व अर्ज ://... या संकेतस्थळावर सादर करावेत, असे आवाहन कृषी संचालक, आत्मा, कृषी आयुक्तालय, पुणे यांनी केले आहे.

# आरोग्य सेवेत कट प्रॅक्टिस व निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही - सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

**जनसंचलन-मुंबई**

राज्यातील सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार, पारदर्शक आणि तत्पर आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी आरोग्य यंत्रणेने अधिक जबाबदारीने काम करावे. रुग्णांना जाणीवपूर्वक खासगी रुग्णालयांकडे वळविणे, कट प्रॅक्टिसला प्रोत्साहन देणे किंवा शासकीय यंत्रणेतील उपलब्ध सुविधांकडे दुर्लक्ष करणे कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाही. अशा प्रकारांमध्ये दोषी आढळणाऱ्या संबंधित अधिकारी, ईएमएस समन्वयक आणि कर्मचाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल असे स्पष्ट निर्देश सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिले. मंत्रालयातील समिती कक्षात आयोजित या बैठकीसाठी आमदार नरेंद्र भोंडेकर, आमदार महेंद्रशेठ दळवी, आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, आरोग्य संचालक डॉ. विजय कंदेवाड, उपसंचालक राजेंद्र भालेराव यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी, ईएमएस समन्वयक तसेच राज्यातील सर्व जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. आरोग्य मंत्री म्हणाले की, राज्यातील १०८ आणि १०२ रुग्णवाहिका सेवांचा उद्देश गरजू रुग्णांना तातडीने शासकीय रुग्णालयात किंवा महात्मा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत मान्यताप्राप्त रुग्णालयात उपचारासाठी पोहोचविणे हा आहे. काही ठिकाणी रुग्णांना जाणीवपूर्वक विशिष्ट खासगी रुग्णालयांमध्ये पाठविल्याच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. या सर्व प्रकरणाचा मागील सहा महिन्यांचा रेफरल डेटा तपासण्यात यावा. ज्या ठिकाणी अनियमितता आढळेल, तेथे संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले. राज्यात संस्थात्मक प्रसूतींचे प्रमाण वाढविणे हे आपले सर्वोच्च प्राधान्य आहे. यासाठी आशा स्वयंसेविका, आरोग्य कर्मचारी आणि संबंधित अधिकाऱ्यांनी समन्वयाने काम करावे. रुग्णाला अनावश्यकपणे खासगी रुग्णालयात पाठविले जात असल्यास त्याची जबाबदारी निश्चित करण्यात येईल. याबाबत सर्व जिल्ह्यांनी सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल शासनाकडे सादर करावा. राज्यातील प्रत्येक शासकीय आरोग्य संस्थेमध्ये दर्जेदार औषधे, स्वच्छता, आवश्यक मनुष्यबळ आणि गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध राहावी, यासाठी नियमित आणि प्रभावी देखरेख ठेवण्याचे निर्देशही मंत्री आबिटकर यांनी दिले. शासनाने आवश्यक निधी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्यानंतरही कामामध्ये दिरंगाई अथवा निष्काळजीपणा झाल्यास संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. आरोग्य संवाद यात्राफ्च्या माध्यमातून १५ जूनपासून राज्यभर प्रत्यक्ष पाहणी मोहीम राबविण्यात येत असून, उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये तसेच गावपातळीवरील आरोग्य समित्यांच्या कामकाजाची प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करण्यात येणार आहे. या पाहणीदरम्यान आढळणाऱ्या त्रुटींसाठी संबंधित यंत्रणेला जबाबदार धरले जाईल. महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा लाभ राज्यातील प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याने या योजनेच्या अंमलबजावणीला गती द्यावी. गाव, उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि ग्रामीण रुग्णालय स्तरावरील सर्व आरोग्य समित्या अद्ययावत ठेवण्याचे निर्देश देताना कालबाह्य समित्या कायम ठेवण्याचा प्रकार अजिबात सहन केला जाणार नाही असे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. समित्यांमध्ये विद्यमान सरपंच व सदस्यांचा समावेश करून त्यांचे नियमित कामकाज



सुरू ठेवणे ही संबंधित जिल्हा प्रशासनाची जबाबदारी आहे. दर तीन महिन्यांनी आमदारांच्या उपस्थितीत होणाऱ्या जिल्हास्तरीय आरोग्य आढावा बैठकींना सिव्हिल सर्जन आणि जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी स्वतः उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या बैठकीत लोकप्रतिनिधींमार्फत स्थानिक आरोग्य सेवांच्या गरजा, समस्या आणि अपेक्षा थेट प्रशासनापर्यंत पोहोचतील. या बैठकींचे इतिवृत्त शासनाकडे सादर करण्यात येणार असून त्याआधारे पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले. आरोग्य सेवेमध्ये पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि गुणवत्तेला सर्वोच्च प्राधान्य देत राज्यातील प्रत्येक नागरिकाला विश्वासार्ह आणि सक्षम शासकीय आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी संपूर्ण आरोग्य यंत्रणेने संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करावे, असे आवाहन सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाची स्पेशल एन्ट्री कोणासाठी? जयश्री शेळकेंचा थेट सवाल

## सामान्य आंदोलक चिखलात सत्ताधारी कार्यालयासमोर?बुलढाण्यात आंदोलनामागचं खरं कारण काय?

**जनसंचलन-बुलढाणा**

ज्यांच्या राजाश्रयामुळेच अवैध धंदे आणि गुन्हेगारीला खतपाणी मिळाले, तेच लोक आज त्याविरोधात आंदोलन करत असतील तर ही बाब हास्यास्पद आहे,फ्र असा घणाघाती आरोप उबाठा निष्ठावंत प्रवक्त्या ॲड. जयश्री शेळके यांनी केला आहे. बुलढाणा जिल्हाच नव्हे तर राज्यभर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न गंभीर बनला असून अवैध व्यवसाय आणि गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढल्याचे शेळके यांनी माध्यमांसमोर सांगितले. विशेष म्हणजे, आता भारतीय जनता पक्षालाच त्यांच्या मित्रपक्षाकडून घरचा आहेर मिळाला असून निदान यानंतर तरी प्रशासन जागे होऊन कारवाई करेल का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मात्र या आंदोलनामागे नेमके कारण काय, हेही तपासणे गरजेचे आहे, असे सांगत शेळके यांनी आणखी गंभीर प्रश्न उपस्थित केला. कधी नव्हे ते आंदोलन करणाऱ्यांचे काही हितसंबंध दुखावले गेले आहेत का? त्यामुळेच आंदोलनाचा मार्ग स्वीकारला आहे का? याची चौकशी व्हायलाच हवी,फ्र असे त्या म्हणाल्या. याचबरोबर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाला परवानगी देण्याच्या मुद्द्यावरूनही त्यांनी प्रशासनाला धारेवर धरले. तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण मंडप लावण्यास बंदी घालणारे आदेश काढले होते. मग आता सत्ताधारी पक्षाशी संबंधित लोकांसाठी विशेष बाब म्हणून परवानगी देण्यात आली का? असा थेट प्रश्न त्यांनी उपस्थित केला. आजही अनेक आंदोलक जिजामाता प्रेक्षागारासमोर चिखलात, घाणीत आणि पावसात आंदोलन करत



आहेत. दुसरीकडे सत्ताधारी पक्षातील लोकांना जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलनाची मुभा मिळत असेल, तर बुलढाण्यात सामान्यांसाठी वेगळे आणि सत्ताधाऱ्यांसाठी वेगळे नियम आहेत का? असा सवाल आता जनतेतूनही विचारला जात आहे.

# ९ पोलिसांना जन्मठेप! कोठडीतील मृत्यू प्रकरणात १५ वर्षांनी न्यायाचा घणाघात; वाशिम न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल

**जनसंचलन-वाशिम**

तब्बल १५ वर्षे, १ महिना आणि २३ दिवसांच्या प्रदीर्घ न्यायालयीन लढ्यानंतर अखेर पीडित कुटुंबाला न्याय मिळाला आहे. २०११ मधील कोठडीतील मृत्यू प्रकरणात वाशिम जिल्हा सत्र न्यायालयाने ऐतिहासिक निर्णय देत रिसोड पोलीस ठाण्यातील तत्कालीन ठाणेदारांसह नऊ पोलिसांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. जिल्हा सत्र न्यायाधीश जयसिंग झपाटे यांनी दिलेल्या या निकालाने संपूर्ण पोलीस दलात खळबळ उडाली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, ९ मे २०११ रोजी रिसोड पोलीस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार महादेव माणिक धांडे यांच्यासह पोलीस पथकाने हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील वाढोणा येथील पारधी वस्तीवर धाड टाकली होती. या कारवाईदरम्यान बेग्या पवार या तरुणाला चोरीच्या गुन्ह्यात संशयित म्हणून ताब्यात घेण्यात आले. गुन्ह्याची कबुली मिळवण्यासाठी पोलिसांनी त्याला अमानुष मारहाण केल्याचा आरोप होता. या मारहाणीतच १० मे २०११ रोजी बेग्या पवार यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर सीआयडीने ३४ दिवस तपास करून संबंधित पोलिसांविरोधात खुनाचा गुन्हा तसेच ॲट्रॉसिटी कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला होता. दीर्घ सुनावणीनंतर न्यायालयाने तत्कालीन ठाणेदार महादेव धांडे यांच्यासह मदन पवार, शिवाजी खिल्लारी, पंजाब पाटकर, रमेश पवार, प्रकाश तारम, नागोराव खांडके, अशोक वैद्य आणि वसंत जाधव या नऊ जणांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली. बेग्या पवार यांच्या आईने आरोप केला की, त्यांच्या मुलाविरुद्ध यापूर्वी कोणताही गुन्हा नव्हता. केवळ तो पारधी समाजातील असल्याने त्याला अडकवण्यात आले. निकालानंतर आई-वडिलांनी न्यायालय, सीआयडी आणि सरकारी वकिलांचे आभार मानत उशिरा का होईना, पण न्याय मिळाला अशी भावना व्यक्त केली. सरकारी वकील श्रीराम काळू यांनी हा निकाल सर्वसामान्यांच्या न्यायावरील विश्वासाला बळ देणारा असल्याचे सांगितले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८